# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.03.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

१. अर्थसंकल्पानंतरच्या तीन वेबिनारमध्ये आज पंतप्रधान सहभागी होणार,
२. वन्यजीव व्यवस्थापनासाठी पारंपरिक ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन,
३.परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर आजपासून ब्रिटन आणि आयर्लंडच्या दौऱ्यावर
४. महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठी येत्या 27 मार्च रोजी मतदान,
आणि
५. चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताची आज ऑस्ट्रेलियाशी लढत.

**मोदी वेबिनार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अर्थसंकल्पानंतरच्या तीन वेबिनारमध्ये सहभागी होणार आहेत. अर्थसंकल्पीय घोषणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि त्यासाठीचे प्रयत्न अधोरेखित करण्यासाठी या वेबिनारचं आयोजन करण्यात आलं आहे. हे वेबिनार एमएसएमईच्या वाढीसाठी उपयुक्त योजना, उत्पादन, निर्यात आणि अणुऊर्जा मोहिमा तसंच गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेमध्ये सुधारणा या विषयावर आयोजित करण्यात आले आहेत. पंतप्रधान याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करणार आहेत. या वेबीनारच्या माध्यमातून सरकारी अधिकारी, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि व्यापार तज्ज्ञांना भारताच्या औद्योगिक, व्यापार आणि ऊर्जा धोरणांवर चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ मिळणार आहे.

**मोदी वन्यजीव**

वन्यजीव व्यवस्थापनासाठी पारंपरिक ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर करावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमध्ये जुनागढ जिल्ह्यात सासनगीर इथं राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची सातवी बैठक पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली काल झाली. त्यावेळी ते बोलत होते. नदीतल्या डॉल्फिनविषयी करण्यात आलेलं पहिलं वहिलं सर्वेक्षण त्यांनी प्रकाशित केलं. डॉल्फिन संवर्धनाविषयी स्थानिक रहिवाशांमधे जागृती निर्माण करावी, असं मोदी यांनी सांगितलं. देशातल्या सिंहगणनेची 16 वी फेरी यंदा घेण्यात येईल, असं सांगत त्यांनी बार्डा अभयारण्यात सिंहांच्या जतनासाठी मदत जाहीर केली. याखेरीज देशात अन्यत्र चित्ते आणण्याची, नदीकाठच्या परिसरात व्याघ्र जतन आणि मगरींचं जतन करण्याची योजना असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. माळढोक पक्षी आणि अस्वलाच्या प्रजातींचं जतन करण्यासाठीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याचं प्रकाशनही त्यांच्या हस्ते झालं. वन्यजीवनातले संघर्ष टाळण्याच्या दृष्टीनं जलद प्रतिसाद पथकांना आधुनिक तंत्रज्ञान दिलं जाईल, असं ते म्हणाले. या विषयाच्या संशोधन आणि अभ्यासाकरता तमिळनाडूत कोईमतूर इथं उत्कृष्टता केंद्राची स्थापना करण्याची घोषणा पंतप्रधानांनी यावेळी केली.

**बेल्जियम राजकुमारी**

भारत दौऱ्यावर असलेल्या बेल्जियमच्या राजकुमारी ॲस्ट्रिड आज नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. त्या आठ मार्चपर्यंत भारताच्या दौऱ्यावर आहेत. राजकुमारी ॲस्ट्रिड यांनी बेल्जियमचे संरक्षणमंत्री थियो फ्रँकस्केन यांच्यासमवेत काल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. त्यांनी दोन्ही देशांमधील संरक्षण औद्योगिक सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा केली.

राजनाथ सिंह यांनी संरक्षण क्षेत्रात बेल्जियमच्या गुंतवणुकीचं स्वागत केलं. बेल्जियमच्या कंपन्या भारतात त्यांचा विस्तार करून आणि भारतीय उत्पादकांना त्यांच्या पुरवठा साखळीत समाविष्ट करून महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, अशी सूचना राजनाथ सिंह यांनी केली.  एक संस्थात्मक संरक्षण सहकार्य यंत्रणा निर्माण करण्याबाबत दोन्ही देशांनी सहमती दर्शविली.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज ब्रिटन आणि आयर्लंडच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान ते ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री  डेव्हिड लॅमी यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा करतील. इतर अनेक मान्यवरांचीही ते भेट घेणार आहेत, तर आयर्लंडच्या दोन दिवसांच्या भेटीदरम्यान डॉक्टर जयशंकर आयर्लंडचे परराष्ट्र मंत्री सायमन हॅरिस आणि इतर मान्यवरांची भेट घेतील.  भारतीय समुदायाच्या सदस्यांनाही ते भेटणार आहेत. भारत आणि आयर्लंडमध्ये लोकशाही मूल्य, सांस्कृतिक संबंध आणि वाढत्या आर्थिक सहभागावर आधारित मैत्रीपूर्ण द्विपक्षीय संबंध आहेत.

**राष्ट्रपती**

शिक्षणाबरोबरच संशोधनावरही विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित अभ्यागत परिषदेच्या उदघाटन  कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. सरकारनं एका चांगल्या उद्देशानं राष्ट्रीय संशोधन निधी सुरु केला असून उच्च शिक्षण संस्थांनी या उपक्रमाचा लाभ घेत संशोधनाला प्रोत्साहन द्यावं, असंही त्या म्हणाल्या. कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा स्तर त्या देशाच्या शिक्षण प्रणालीतून दिसून येत असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताला ज्ञान अर्थव्यवस्थेचं केंद्र म्हणून स्थापित करण्यात उच्च शिक्षण संस्था प्रमुखांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं त्या म्हणाल्या.

**निवडणूक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं त्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होत आहे. विधानसभा आमदारांमधून ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी 10 मार्चला अधिसूचना जाहीर होईल. अर्ज दाखल करण्यासाठी 17 मार्चपर्यंत मुदत असून18 मार्चला अर्जांची छाननी झाल्यावर 20 मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता भासल्यास 27 मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी 5 वाजता मतमोजणी होईल.

**अधिवेशन**

सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला कालपासून मुंबईत राज्यपालांच्या अभिभाषणानं सुरुवात झाली. यावेळी राज्यपालांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. देशाच्या एकंदर स्थूल उत्पादनात राज्याचं 14 टक्क्यांपेक्षा अधिक योगदान असून थेट परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती असल्याचं ते म्हणाले. दावोसमध्ये झालेल्या 15 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सामंजस्य करारांचा आणि त्यातून निर्माण होऊ शकणाऱ्या 15 लाखांहून अधिक रोजगाराच्या संधीचा उल्लेख त्यांनी केला. राज्य सरकारनं अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी काल 6486 कोटी 20 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक 3 हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहेत.

**लाडकी बहीण**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच 7 मार्च रोजी सर्व लाभार्थींना  दिला जाणार असून मार्च महिन्याचा हप्ता अर्थ खात्यातून निधी मिळाल्यानंतर देण्यात येईल, अशी माहिती

महाराष्ट्राच्या महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी काल विधान भवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दिली. 2 कोटी 40लाखांपेक्षा अधिक महिला या योजनेच्या लाभार्थी असल्याचं त्या म्हणाल्या.

**क्रिकेट**

आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताची लढत आज ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. उपांत्य फेरीचा हा पहिला सामना आज दुपारी अडीच वाजता दुबई इथं  खेळला जाणार आहे. उपांत्य फेरीचा दुसरा सामना 5 मार्चला न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन संघांदरम्यान लाहोर इथं  होणार आहे. उपांत्य फेरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या सामन्यात विजयी ठरणाऱ्या दोन संघादरम्यान 9 मार्चला अंतिम सामना होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**